अतारांकित प्रश्नोत्तरांची ९८ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

गोंदिया जिल्ह्याचा समावेश मालमत्ता हस्तांतरण कायद्यात करण्याबाबत

(१) ५४४५ (१६-०४-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा मोठ्या स्वरूपाचे व्यापारी उद्योग केंद्र असून या जिल्ह्यात Equitable Mortgage नसल्याने सिम्पल Mortgage नोंदवावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गोंदिया जिल्ह्याचा समावेश मालमत्ता हस्तांतरण कायद्यात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (३१-५-२०२२) :(१) व (२) होय. हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक: नोंदणी-२०२१/टिपी/६४४/प्र.क्र.१३२/म-१(धोरण), दि.६.९.२०२१ अन्वये मालमत्ता हस्तांतरण अधिनियम,१८८२(१८८२ चा ४) महाराष्ट्र राज्यात लागू असतांना, त्याच्या कलम ५८ च्या खंड (च) व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत काढलेल्या आधीच्या सर्व अधिसूचना, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासन,याव्दारे उक्त अधिनियमाच्या कलम ५८ च्या खंड (च) च्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र राज्यातील सर्व नगरे,गावे,तालुके आणि जिल्हे, विनिर्दिष्ट केले आहेत.

त्यामुळे या अधिसूचनेव्दारे सर्वच जिल्हे, तालुके, गावे आणि नगरे यांचा समावेश असल्याने त्याचा फायदा सर्वच स्तरातील व्यक्तींना होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ऑनलाईन दस्त नोंदणीच्या प्रस्तावाबाबत

(२) ११४४१ (१२-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राने दस्त नोंदणीची प्रणाली विकसित केली असून त्याबाबतची चाचणी यशस्वी झाल्याने नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने ऑनलाईन पद्धतीने दस्त नोंदणी व मुद्रांक शुल्क करण्याचा प्रस्ताव तयार करून दिनांक ८ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास मान्यतेसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधी व न्याय विभागाने या प्रस्तावाच्या अनुषंगाने अभ्यास पूर्ण करुन मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (३१-५-२०२२) :(१) होय.

(२) कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये ऑनलाईन दस्त बाबतचा प्रस्ताव महसूल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभागास प्राप्त झाला असुन त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले असून त्याअनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

राज्यातील शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना
वैद्‌यकीय देयकांची प्रतीपूर्ती करण्यात आली नसल्याबाबत

(३) ३२५१९ (०२-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विविध आजारांवरील उपचारासाठी त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना शासनाच्या वतीने आजारपणानंतर घेतलेल्या उपचाराचा खर्च देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बऱ्याच शासकीय अधिकारी - कर्मचाऱ्यांना गेल्या २ वर्षांपासून वैद्‌यकीय देयकांची प्रतीपूर्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना वैद्‌यकीय देयकांची प्रतिपूर्ती त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (२५-०५-२०२२): (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १६.०३.२०१६ च्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयान्वये रु.३,००,०००/- पर्यंतच्या तसेच रु.३,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती वेळोवेळी करण्यात येते.
(४) प्रश्न् उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी कल्याण या मार्गाच्या मेट्रोच्या कामास होत असलेला विलंब

(४) ३३०९३ (११-०१-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी मार्गे कल्याणला जाणाऱ्या मेट्रोचा मार्ग हा कल्याण नाका किंवा वंजारपट्टी मार्गे जाणार यात संभ्रम निर्माण झाल्याने भिवंडी ते कल्याण या मार्गीकेबाबत सर्वे करण्यासाठी एमएमआरडीए मार्फत मे.दिल्ली मेट्रो रेल्वे कार्पोरेशन कंपनीची नियुक्ती दिनांक ५ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मे.दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीने भिवंडी ते कल्याण जाणाऱ्या मार्गीकेबाबतचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मे.दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीने सादर केलेल्या अहवालाची स्थिती काय आहे व त्यानुषंगाने कल्याण नाका ते कल्याणकडे जाणाऱ्या मार्गीकेबाबतच्या निविदा प्रक्रियेची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) मे. दिल्ली मेट्रो रेल कॉ. लि. या सल्लागार कंपनीने माहे जानेवारी २०२१ मध्ये सुसाध्यता अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केला आहे.
(३) व (४) सल्लागाराने सादर केलेल्या शिफारसी प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत असून यथायोग्य निर्णयाअंती निविदा तसेच इतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता. खेड) आणि मौजे आबलोली (ता. गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

(५) ३५०२८ (१०-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर): सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०११च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याचे काम शासनाकडून गत पाच वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडा तयार करण्याचे काम पूर्णत्वास जात नसल्याने रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता. खेड) आणि मौजे आबलोली (ता. गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जोडबृहत आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह सदर आराखडा लवकरात लवकर तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२): (१),(२),(३) व (४) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१३ व दिनांक ०९.०६.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापन करणे आणि अस्तित्वात असलेल्या संस्थांचे श्रेणीवर्धन करणे आवश्यक असल्याने राज्यातील आरोग्य संस्थांचे प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई कार्यालयाकडे मागविण्यात आलेले होते.

रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे ता.खेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. .

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, आबलोली चे ग्रामीण रुग्णलयात श्रेणीवर्धन करणेबाबतच्या प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्याने आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय यांचेकडून अधिकची माहिती मागविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील हिंजवडी शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाबाबत

(६) ३६२७६ (१७-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर): सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हिंजवडी ते शिवाजीनगर हा मेट्रो प्रकल्प हाती घेतला असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात कधी सुरू होणार असून, सदरहू प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२२) :(१) व (२) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाची सार्वजनिक खाजगी सहभागाने संकल्पन करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा व हस्तांतरित करा (DBFOT) तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास शासन निर्णय दि. ०९ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाची उभारणी पुणे, आयटी.सीटी मेट्रो रेल लि. या सवलतकर कंपनीमार्फत करण्यात येणार असून प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकास दि. २५ नोव्हेंबर, २०२१ पासून सुरुवात झाली आहे. पुढील ४० महिन्यांत प्रकल्प बांधकाम पुर्णत्वास नेण्याचे बंधन सवलतकार कंपनीवर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

देवळाली तालुक्यातील (जि.नाशिक) येथील रस्त्यांच्या विशेष दुरुस्ती/पुरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत विशेष बाब म्हणून मंजुरी मिळण्याबाबत

(७) ३६३२० (११-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील देवळाली मतदार संघातील वाहतुकीसाठी महत्वाच्या असणाऱ्या १) महिरावणी (राज्यमार्ग क्र.३७) ते गंगावऱ्हे सावरगाव गोवर्धन चांदशी मातोरी दरी मनोली वडगाव दाभडगाव नाईकवाडी पारधीवाडा लाडची ते राज्यमार्ग क्र.२९ रस्ता प्रजिमा १७६ (भाग-मातोरी ते दरी),२) महिरावणी (राज्यमार्ग क्र.३७) ते गंगावऱ्हे सावरगाव गोवर्धन चांदशी मातोरी दरी मनोली वडगाव दाभडगाव नाईकवाडी पारधीवाडा लाडची ते राज्यमार्ग क्र.२९ रस्ता प्रजिमा १७६ (भाग-सुला वाईनरी ते गंगावऱ्हे),३) राष्ट्रपती महामार्ग क्र.३ मोहाडी फाटा सय्यदपिंप्री लाखलगाव हिंगणवेढे कोटमगाव जाखोरी चांदगिरी शिंदे ते रा.म.मार्ग क्र.५० राज्यमार्ग ३७ किमी ०/०० ते ४/००,६/००ते८/००, ८/०० ते १५/००, १८/०० ते २३/०० ची विशेष दुरुस्ती करणे, ४)प्रजिमा २६ भगूर लहवित वंजारवाडी राष्ट्री महामार्ग क्र.३ ला जोडणारा रस्ता प्रजिमा २१ किमी ६/०० ते १३/६०० ची विशेष दुरुस्ती करणे, ५) प्रजिमा २६ ते भगूर नानेगाव पळसे रस्ता प्रजिमा ३८ किमी २/०० ते ५/०० ची विशेष दुरुस्ती करणे या रस्त्यांच्या कामांना विशेष

दुरुस्ती/पुरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती पत्राद्वारे तेथील लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री यांचेकडे दि.२४ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांच्या कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे काय, असल्यास, केव्हा वितरीत करण्यात आलाआहे,
(३) असल्यास, रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात करण्यांत आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (२०-०४-२०२२): (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित पाच कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली असून, या कामांकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांना अवजारांचे वाटप करण्यात न आल्याबाबत

(८) ३६६२९ (०७-०१-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकरी व जिल्हा परिषदेच्या कृषी विकास अधिका-यांनी शासनाने विकत घेतलेली ८५ हजार अवजारे शेतक-यांना वाटप केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्तालयाकडून योजनानिहाय व वर्षनिहाय वाटप झालेल्या अवजारांचा अहवाल मागितला असता त्याबाबत कोणताही ताळमेळ लागत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकाशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार अवजारे विक्रीनंतर उर्वरित रकमेचा भरणा न केलेल्या तसेच अनावश्यक अवजारांची खरेदी करणाऱ्या संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश कृषी आयुक्त कार्यालयाने काढण्याबाबत शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) नाही, ताळमेळ घेण्याचे काम सुरु आहे.
(३) होय, आयुक्त (कृषि) यांचेकडून चौकशी सुरु आहे.
(४) आयुक्त कृषि यांच्या स्वाक्षरीने सर्व संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व विभागीय कृषि सह संचालक यांना पत्र दिलेले आहे. तत्कालीन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना विद्यापीठाने मुल्यमापन केंद्राच्या खर्चासाठी दिलेल्या रकमेबाबत

(९) ३७७४९ (३१-०३-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना विद्यापीठाने मुल्यमापन केंद्राच्या खर्चासाठी आगाऊ रक्कम म्हणून देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती महाविद्यालयांनी या खर्चाचा हिशोब विद्यापीठास सादर केलेला आहे,

(३) असल्यास, ज्या महाविद्यालयांनी हिशोब दिलेला नाही, त्यांच्याकडून खर्च झालेल्यापैकी शिल्लक असलेल्या उर्वरीत रक्कमेचा हिशोब दिला नसल्यास उक्त रक्कम १८ टक्के व्याजाने वसूल करण्याचा निर्णयही मुंबई विद्यापीठाने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२): (१) हे खरे आहे.

(२) एकूण ५० महाविद्यालयांनी परिक्षा संबंधित मूल्यमापन केंद्राच्या खर्चाचा हिशोब सादर केलेला आहे.

(३) व (४) उर्वरित महाविद्यालयाकडून अग्रिम रक्कमेपोटीचा हिशोब मागविण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई विद्यापीठातील पदव्युतर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करण्याबाबत

(१०) ३७८०९ (०१-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) श्री.योगश सागर (चारकोप): सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयीन शिक्षण सुरू होऊनही मुंबई विद्यापीठाने पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसह पीएचडी करणा-या महिलांसाठी वसतिगृह सुरु केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागासह राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये वसतिगृहे सुरू झाली मात्र मुंबई विद्यापीठाने याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वारंवार मागणी करूनही वसतिगृह सुरु न झाल्यास विद्यार्थ्यांनी बेमुदत आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणाबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले मार्गदर्शक तत्वे अथवा मानक कार्यप्रणाली तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून मुंबई विद्यापीठातील वसतिगृह सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि. नागपूर) येथील तालुका कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

(११) ३८२६४ (०१-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि. नागपूर) येथील तालुका कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी हे पद ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही पदावरील कामकाज अतिरिक्त कार्यभाराने चालविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत सदर दोन्ही पदांवर कार्यक्षम अधिका-याची नियुक्ती करण्याबाबतची मागणी करण्यात आली असून उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत रिक्त पदे भरण्याबाबतचे दिनांक १२/१०/२०२१ चे निवेदन मा. मंत्री (कृषि) यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

तालुका कृषि अधिकारी, रामटेक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार मंडळ कृषि अधिकारी, देवलापार यांच्याकडे व उपविभागीय कृषि अधिकारी, रामटेक या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार तालुका कृषि अधिकारी, पारशिवनी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

वित्त विभागाच्या दि. ०२/०६/२०१५ आणि तसेच दि. ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध होते. तद्नंतर महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ (कृषि उपसंचालक) संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील १९ रिक्त पदे भरण्याबाबतचे मागणीपत्र तसेच महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ६१ रिक्त पदे भरण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून दि. १८/०२/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील ५५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवेने/पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होताच उपरोक्त रिक्त पदे भरण्याकरिता प्राथम्यक्रमाने विचार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेस पुरातन काळातील वस्तुंचे सुस्थितीत जतन करण्यासाठी शासनाने निधी व जागेची उपलब्धता करुन देणेबाबत

(१२) ३८२८६ (०१-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील डेक्कन कॉलेजला सिंधू संस्कृतीच्या शोधासाठी केलेल्या उत्खननामुळे जागतिक पातळीवर विख्यात असलेल्या हडप्पासारख्या विविध उत्खनन स्थळांवरुन संकलित केलेल्या वस्तूंचे जतन करण्यांत अडचणी निर्माण झाल्या असून पुरातत्वशास्त्रज्ञांनी सन १९४० पासून संकलित केलेले लाखो वर्षांपूर्वीचे नमुने प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरुन ठेवण्याची वेळ दोनशे वर्षे जुन्या शैक्षणिक संस्थेवर आली असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षात देशभरातील १०० हून अधिक ठिकाणांहून विविध प्रकारचे नमुने संकलित करण्यांत येऊन त्यात मानवी सांगाडे, झाडांची पाने आणि मुळे, हाडे, दात, भांडी, धान्य, शिंपले, धातूंच्या वस्तू, दगड, मातीचे दागिने, मातीचे नमुने आदींचा समावेश असून काही हाडे आणि सांगाडे फरशीवर, टेबलवर, दरवाजे नसलेल्या कपाटांमध्ये उघडेच ठेवण्यात आले आहे तथापि, त्यांच्या जतनासाठीच्या आवश्यक तापमानावर काहीच नियंत्रण ठेवता येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेस शासनाकडून मिळणारा निधी कमी झाल्याने उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून देखभाल निधी मिळणे अपेक्षित असून तशी सदर संस्थेने शासनाकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लाखो वर्षापुर्वीचे दुर्मिळ साहित्य जतन करण्यांत पुणे येथील डेक्कन कॉलेज व तत्सम संस्थांना निधी व जागेअभावी येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२): (१) अंशतः खरे आहे.
उत्खननातुन संकलित केलेले नमुने कापसात किंवा ॲल्युमिनियम फॉइलमध्ये गुंडाळुन झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवले जातात.
(२) अंशत: खरे आहे.
मानवी सांगाडे आणि दात मानव्यविद्या विभागात जतन केले जातात. ते कापसात गुंडाळुन व्यवस्थितपणे प्लास्टिक डब्यांमध्ये ठेवले जातात. शिंपले व प्राण्यांची हाडे पुराजीवशास्त्र विभागात कापसात गुंडाळून प्लास्टिक डब्यांमध्ये किंवा झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवले जातात. वनस्पतीजन्य पुरावे आणि धान्य कापसात गुंडाळून प्लास्टिक डब्यांमध्ये किंवा झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवले जातात. मातीची भांडी त्यांसाठी बनविलेल्या कापडी पिशव्यांमध्ये ठेवली जातात. मातीचे दागिने कापसात गुंडाळुन प्लास्टिक डब्यांमध्ये किंवा झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवले जातात. मातीचे नमुने झिपलॉक पिशव्यांमध्ये ठेवले जातात. जी हाडे व सांगाडे आधुनिक असुन, केवळ तोलनिक अभ्यासासाठी वापरली जातात तीच केवळ दरवाजे नसलेल्या कपाटात किंवा टेबलावर ठेवली जातात.
(३) खरे आहे.
(४) डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे या संस्थेचे द्विशताब्दी वर्षपूर्ती निमित्त बांधकाम व आधुनिकीकरणासाठी निधीची मागणी वित्त विभागास करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

देसाईगंज (जि.चंद्रपूर) येथे केंद्र शासनाची "आयुष्यमान भारत "योजनेतंर्गत गरीब गरजू रुग्णांची फसवणुक झाल्याबाबत

(१३) ३८६९० (२४-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देसाईगंज (जि.चंद्रपूर) येथे केंद्र शासनाची "आयुष्यमान भारत" योजनेतंर्गत गरीब गरजू रुग्णांची फसवणूक झाली असल्याचे माहे जुलै-२०२१मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, "आयुष्यमान भारत" या योजनेची अंमलबजावणी बाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याने याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२७-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
श्री. तारक माखनलाल गोस्वामी राहणार वडसा (देसाईगंज) जिल्हा गडचिरोली यांच्या पत्नीने क्रिस्तानंद रुग्णालय ता. ब्रह्मपूरी, जिल्हा चंद्रपूर या विरुद्ध एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ दिला नसल्याबाबत तक्रार केली आहे.

(२) व (३), याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीने चौकशी केली असून रुग्णाच्या पत्नीने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने रु.२०,०००/-ची रक्कम त्यांना धनादेशाद्वारे परत करण्यात आली आहे. सदर तक्रारदाराने तक्रारीचे निराकरण झाल्याबाबत पत्र दिले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) शहरातील कोरोना योध्दाना सन्मानपत्र देऊन गौरव करण्याबाबतचा प्रस्ताव

(१४) ३८९०७ (२४-०४-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य): सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील ज्या ज्या योध्दांनी कोरोना काळात जीवावर उदार होऊन काम केलेल्या डॉक्टर्स, नर्सेस, रुगणालयातील अधिकारी व कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, दानशूर आदिंचा "सन्मानपत्र" देऊन गौरव करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधित मंत्री, सचिव, अदिंकडे पत्रव्यवहार करुन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२): (१) हे खरे आहे,
कोवीड-१९ मध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार सर्व जिल्हयांना ३१ मार्च, २०२१ आणि १७ जून, २०२१ रोजीच्या उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील सर्व जिल्हयांनी जिल्हयातील आरोग्य विभागासंबंधीत अधिकारी, कर्मचारी, आशा गटप्रवर्तक, आशा स्वंयसेवीका व इतर संवर्गातील कोविड-१९ मध्ये उल्लेखनिय काम करणाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्याबाबत उपरोक्त नमूद पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) येथील श्रीमलंग गडावर पायाभूत सुविधा व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत

(१५) ३८९५० (०९-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील श्रीमलंग गडावर पायाभूत सुविधा व पिण्याच्या पाण्याची सोय

उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने उसाटणे येथून जाणाऱ्या एमआयडीसीच्या जलवाहिनीतून स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरीता किती कोटी रुपयांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे व त्यानुषंगाने श्रीमलंग गडावर स्वतंत्र पाणी पुरवठा योजना उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२): (१) होय हे खरे आहे.

(२) मौ. हाजीमलंगवाडी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे या योजनेच्या रक्कम रु ६.१३ कोटी किंमतीच्या नळ पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय दि. १५.२.२०२२अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली असूनया योजनेची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

निविदा जास्तीच्या दराने प्राप्त झाल्याने व बाजारभाव वाढीमुळे निविदा रद्द करुन मजीप्राच्या सन २०२१-२२ दरसूचीच्या शुध्दीपत्रकानुसार नव्याने योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेच्या रक्कम रु. ७.८२ कोटी ढोबळ किंमतीस मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी दि. २७.४.२०२२ रोजी नव्याने तांत्रिक मान्यता प्रदान केली असून नव्याने प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जंगलासह वन्यजीव विभागात वणव्याचा घटना घडल्याबाबत

(१६) ३९१७८ (१८-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण): सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत दोन वर्षात जंगलासह वन्यजीव विभागात माहे नोव्हेंबर २०२० ते जून २०२१ या दरम्यान ३४ हजार २५ वणव्याचा घटना घडल्याचे दिनांक २१ जानेवारी २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशात वणव्याच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य चौथ्या क्रमांकावर आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, सदर वणव्यांच्या घटना थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (२०-०५-२०२२) :१) राज्यात माहे नोव्हेंबर २०२० ते जून २०२१ दरम्यान आगीच्या ९,९९६ घटना घडलेल्या असून त्यामध्ये ३८९३२ हेक्टर वनक्षेत्र आगीमुळे प्रभावित झाले.

(२) होय,

FSIव्दारे प्रसिध्द केलेल्या INDIA STATE OF FOREST REPORT, २०२१ अन्वये

वणव्याच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य चौथ्या क्रमांकावर दर्शविलेले आहे, तथापि, सदर अहवाल हा FSI च्या फायर अलर्ट यंत्रणेवर आधारभुत असल्याचे निदर्शनास येते. सदर अलर्ट मध्ये वनक्षेत्रातील तसेच खाजगी क्षेत्रातील आगीचाही समावेश असल्याचे, बरेचदा क्षेत्रिय पडताळणीअंती दिसून येते. यासंदर्भात क्षेत्रीय स्तरावरील वनवणवा चौकशी अहवाल मागवून वनवणवा माहिती तयार करणे, अभिप्रेत असते.

(३) वनवणवा लागु नयेत म्हणून वनक्षेत्रात जाळरेषा घेण्यात येतात,आग विझवण्यासाठी प्रशिक्षीत अधिकारी/कर्मचारी वनमजूर यांचे फायर फायटींग पथक तयार करण्यात येते व त्यांना आवश्यक ती साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येते तसेच वन व्यवस्थापन समिती/वन संरक्षण समित्यांना सक्रियरित्या सहभागी करण्यात येत असुन वन्यजीव प्रेमी यांचे व्हाट्सअप/SMS ग्रुप तयार करण्यात आले असुन त्यांचे कडूनही वनवणवा लागल्याची माहिती दिली जाते त्यामुळे वनवणवा विझविण्यास मदत होते, अभयारण्यातील व अभयारण्याबाहेरील गावात वनवणवा बाबत कार्यशाळा आयोजित केल्या जातात, आगीवर नियंत्रण करण्याकरिता वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असुन तो २४ तास कार्यरत आहे, गाव पातळीवरील संयुक्त वनव्यावस्थापन समितीचे अध्यक्ष/सचिव तसेच स्थानिक लोकांची सभा आयोजीत करुन भिंती पत्रके, आठवडी बाजारात बॅनर लावून जनजागृती केली जाते,तसेच "हॅलो फॉरेस्ट ही हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्र.१९२६" वर कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही?

हिंगणा (जि. नागपूर) वनपरिक्षेत्राअंतर्गत अंबाझरी उपवन क्षेत्रात
लागलेल्या आगीमुळे झालेले नुकसान

(१७) ३९३०७ (१८-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.हिंगणा) वनपरिक्षेत्राअंतर्गत अंबाझरी उपवन क्षेत्रात लागलेल्या आगीत दीड हेक्टर वनक्षेत्र जळाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीमुळे मोठ्या प्रमाणात पक्षांची घरटी जळाल्याने जंगलातील जैवविविधतेची मोठी हानी झाली असल्याचे निदर्शनास झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने अश्या घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (३०-०५-२०२२) : (१) होय,

हिंगणा वनपरिक्षेत्राअंतर्गत उपवनक्षेत्र अंबाझरी नियतक्षेत्र अंबाझरी बिट-२ कक्ष क्र.७९९ पांढराबोडी प्रत्यक्षात जळीत क्षेत्र १.७४१ हे.आ. आहे.

(२) नाही,

सदर जळालेल्या क्षेत्रात गवत प्रजातीचे सपाट मैदान असल्याने पक्षांची घरटी व इतर मोठी हानी झाली नाही,

(३) सदर प्रकरणी वनगुन्हा क्र.०४८१८/१२०४२७ दि.२.१.२०२२ नोंद करण्यात आली असून, काही पतंगबाजीनी अपप्रवेश करुन सदर आग लावल्याचे चौकशी अंती निदर्शनास आले आहे. सदर क्षेत्रात गस्तीत वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पूर्व विदर्भात शेतकऱ्यांना रस्ते उपलब्ध नसल्याने गैरसोय होत असल्याबाबत

(१८) ३९३२९ (०७-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भात रस्ते उपलब्ध नसल्याने शेतक-यांना शेतात ये-जा करण्यास व कृषी औजारे नेण्यास गैरसोय होत असून मातोश्री ग्रामसाम्रद्धी शेत / पाणंद रस्ते योजना, शेतकरी रस्ता योजना राबवूनही अद्याप पूर्व विदर्भात रस्ते उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शेतक-यांना येण्या-जाण्याची गैरसोय टाळण्याकरीता राबविलेली मातोश्री ग्रामसाम्रद्धी शेत / पाणंद रस्ते योजना, शेतकरी रस्ता योजना विदर्भात प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने किती प्रस्तावाना आतापर्यंत मंजूरी दिली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संदीपानराव भुमरे (२५-०५-२०२२): (१) हे खरे नाही.
(२) सन २०२१-२२ मध्ये राज्यात १३८३ मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते कामांना मंजुरी देण्यात आली असून पूर्व विदर्भात ८४ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.त्याचप्रमाणे २०२२-२३ या वितीय वर्षात राज्यात ७११८ व पूर्व विदर्भात ६५७ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

(१९) ३९३६६ (०९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर): सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यात शासन दरवर्षी पाणी टंचाई निवारणार्थ विविध प्रकारच्या योजना राबवून यावर कोटयवधीचा निधी खर्च करत असतानाही राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात दरवर्षी पाणी टंचाई निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर्षी तालुका पंचायतच्यावतीने संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयात तालुक्यातील १०१ पैकी सुमारे ७० ग्रामपंचायतींनी पाणी टचांई दूर करण्यासाठी व आवश्यक उपाययोजनांसाठी निधीचे प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संभाव्य पाणी टंचाई दूर होण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध होण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) अशंतः खरे आहे

राजापूर तालुक्यात भुस्तरीय जडणघडण ही पाणी साठयाच्या क्षमतेसाठी मर्यादीत स्वरूपाची आहे. त्यामुळे दरवर्षी टंचाई निर्माण होते.

तथापि जानेवारी-२२ मध्ये टंचाई निदर्शनास आली नाही.

(२) व (३) राजापूर तालुका पंचायतीच्यावतीने प्राप्त झालेल्या तालुक्याचा ३६ गावांतील ६९ वाडयांचा संभाव्य पाणी टंचाई आराखडा मंजूर आहे.

तसेच राजापूर व इतर ८ तालुक्यांचा एकत्रित ४४१ गावांतील ९५२ वाडयांचा रु. ११४१.४३ लक्ष निधी आवश्यक असलेला टंचाई कृती आराखडा मंजूर आहे. योजनांच्या कामांना प्रत्यक्षात मान्यता मिळाल्यानंतरच निधीची मागणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही

तालुक्यातील मौदा, (जि.नागपूर) गावांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या जलशुध्दीकरण केंद्राची झालेली दुरवस्था

(२०) ३९८२९ (०९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुक्यातील रेवराळ, सुंदरगाव, भेंडाळा आणि इसापूर, मौदा (जि.नागपूर) या गावांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत इसापूर येथे जलशुध्दिकरण केंद्र बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जलशुध्दीकरण केंद्राची दुरवस्था झाली असल्याने सदरहू गावांना अशुध्द पाणी पुरवठा होऊन नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे नोव्हें-डिसें.२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलशुध्दीकरण केंद्राची तातडीने दुरुस्ती करुन सदर गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) होय

(२) व (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने योजना पुर्ण केल्यावर सदर योजना जिल्हा परिषद, नागपूरमार्फत हस्तांतरित करून राबविण्याबाबत कुठलीही कार्यवाह न झाल्यामुळे योजनेचा पाणी पुरवठा बंद झाला. दरम्यान विर्शी, रेवराळ, भेंडाळा व सुंदरगांव या गावांना स्वतंत्र भूगर्भीय उदभव घेऊन जिल्हा परिषदेमार्फत योजना पूर्ण करूण शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू आहे. तसेच ईसापूरकरिता स्वतंत्र उदभव घेऊन रू.३९.७६ लक्ष किंमतीची योजना

जिल्हा परिषदेव्दारे जल जीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मंजूर करण्यात येऊन दिनांक १३/१२/२०२१ रोजी कामाचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार प्रलंबित असल्याबाबत

(२१) ३९८४२ (२८-०३-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमातळाच्या विस्तारिकरणाबाबतचा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तार प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विमानतळाचा विस्तार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०४-२०२२) : (१) व (२) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या अनुषंगाने प्रकल्प रखडल्याची बाब खरी नाही. तथापी याबाबतची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.
नागपूर विमानतळाची निविदा प्रकीया रद्द केल्याच्या विरुद्द्ध जी.एम.आर.एअरपोर्ट लि.यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.१७२३/२०२० यामध्ये दिनांक १८/०८/२०२१ ला आदेश पारीत झाला असून, सदर आदेशाविरुध्द १) नागरी विमान वाहतुक मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली २) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली. ३) महाराष्ट्र शासन, मुंबई ४) मिहान इंडीया लि.नागपूर यांनी प्रत्येकी स्वतंत्ररित्या विशेष याचिका (SLP) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील विटा - वेजेगाव कलेढोण या प्रमुख जिल्हा मार्गावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याबाबत

(२२) ३९८४४ (३०-०३-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील जास्त लांबीचा विटा - वेजेगाव- कलेढोण या प्रमुख जिल्हा मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या मार्गावर नेहमीच छोटे-मोठे अपघात होतात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (२८-०४-२०२२) : (१) हे खरे नाही. सदर रस्त्यांवरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही
(३) सदर रस्त्यावर ६ कि.मी.लांबीत रुंदीकरणासह डांबरीकरण व मजबुतीकरणाचे मंजुर काम सदयस्थितीत प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील विद्यापीठांच्या लेखापरीक्षण करण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत

(२३) ३९८६८ (०९-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यापीठांना प्रवेश शुल्काच्या माध्यमातून महाविद्यालयांकडून केंद्र सरकार व राज्य सरकार तसेच विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या विविध योजनांमार्फत कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होतो, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नवीन विद्यापीठ कायद्यानुसार प्रत्येक विद्यापीठाने वर्षातून एकदा लेखा परीक्षण करून घेणे बंधनकारक असुनही बहुतांश विद्यापीठांनी मागील पाच ते सात वर्षापासून त्यांच्या आर्थिक हिशोबाचे कोणतेच लेखापरीक्षण केले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही विद्यापीठांच्या आर्थिक अनियमिततेच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असून सर्व विद्यापीठामध्ये लेखापरीक्षण करण्याबाबत व विद्यापीठातील अनियमिततेला आळा घालण्याकरीता उच्चस्तरीय समितीही स्थापन करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२): (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ, मुंबई वगळता इतर सर्व अकृषी विद्यापीठाचे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत.
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांचे सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ चे लेखापरिक्षण अंतर्गत लेखा परिक्षक व वेधानिक लेखा परिक्षक यांच्याकडुन एप्रिल-२०२१ पर्यंत पुर्ण झालेले असुन, मराठी अनुवादाचे काम सुरु असल्याचे तसेच सन २०१८-१९ चे

लेखापरिक्षण व वेधानिक लेखा परिक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१३-१४ ते सन २०२०-२१ पर्यंतचे सर्व वार्षिक लेखे शासनास अप्राप्त असल्याने दोन्ही विद्यापीठांना सर्व प्रलंबित वार्षिक लेखे शासनास सादर करण्याबाबत अर्धशासकीय पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील अकृषी विद्यापीठांचे नियमित लेखापरीक्षण करण्याकरीता महालेखापाल कार्यालयास दि.२८.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) येथील ट्रामा केअर सेंटरच्या विविध कामांसाठी निधी मंजूर करण्याबाबत.

(२४) ३९८८५ (१३-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील ट्रामा केअर सेंटरच्या विविध कामांचे अंदाजपत्रक तयार करुन शासनास सादर करुन अदयाप निधी मंजूर झाला नसल्याचे माहे जाने, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरिता निधी मंजूर होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले

(४) असल्यास, तदनुसार सदर ट्रामा केअर सेंटरच्या विविध कामासाठी साठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) महाड ट्रामा केअर इमारतीचे बांधकाम पूर्ण होवून सदर इमारत रुग्णसेवेसाठी कार्यान्वित आहे. तथापि अतिरिक्त अग्निप्रतिबंधात्मक सुविधेसाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन विभागास जिल्हा शल्यचिकित्सक यांनी सादर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई, कोकणसह संपूर्ण महाराष्ट्रात अंगणवाडी सेविकांच्या
मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव

(२५) ३९९२३ (१२-०४-२०२२). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, कोकणसह संपूर्ण महाराष्ट्रात अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीमध्ये अंगणवाडी सेविकांना दरमहा रु.८,५०० तर मिनी अंगणवाडी सेविकांना दरमहा रु. ५,७५० आणि मदतनीसानां दरमहा रु.४,५०० मानधन अदा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, कोकणसह संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे दोन लाखहून अधिक अंगणवाडी सेविका कार्यरत असून सदर सेविका नियमित पोलिओ लसीकरण, जनगणना सर्वेक्षण, शासनाचा पोषण आहाराचे वाटप करणे, गरोदर माता नांव नोंदणी व त्यांचे लसीकरण, जनजागृती प्रवृत्त करणे, स्तनदा मातांना मार्गदर्शन, किशोरवयीन मुलीना मार्गदर्शन, महिला व बालकल्याण विभागावे विविध उपक्रम राबविण्यास मदत करणे अशी विविध कामे करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कोरोना काळात देखील अंगणवाडी सेविकांचे मोलाचे योगदान असतांना शासनाकडून त्यांच्या मानधनात वाढ करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याच्या विचाराधीन प्रस्तावावर शासनाकडून कधीपर्यत अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२३-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय, महिला व बाल विकास, दिनांक १६.८.२०१९ नुसार अंगणवाडी सेविकेस रु.८०००/-, मिनी अंगणवाडी सेविकेस रु.५७५०/- व अंगणवाडी मदतनिसला रु.४२५०/- एवढे दरमहा मानधन मंजूर असून त्यात सेवाज्येष्ठतेनुसार वाढ करुन मानधन अदा करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची उद्दिष्टपुर्तीसाठी देण्यात येणाऱ्या ६ सेवांचे कामकाज अंगणवाडी सेविका करतात. तसेच आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोलिओ लसीकरण मोहिमेत स्वेच्छेने सहभागी होतात. त्याकरिता त्यांना आरोग्य विभागामार्फत मानधन देण्यात येते.

(४) सद्यस्थितीत राज्यात अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मानधनापेक्षा अधिक मानधन अदा करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यात कृषी विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(२६) ४००३१ (०१-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यात किमान सहा कृषीमंडळांची गरज असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात चार कृषी मंडळे असून यापैकी दोन कृषी मंडळे, अधिकारी पदे रिक्त असल्याने तालुका कृषी विभागाला तारेवरची कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी नव्याने दोन कृषी मंडळे व पदे मंजूर करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कृषी विभागातील रिक्त असलेली अनेक पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. जत (जि. सांगली), तालुक्यात सहा कृषि मंडळ कार्यालये स्थापन करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी दि. ०६/०९/२०२१ रोजी निवेदन दिलेले आहे.
(२) तालुका कृषि अधिकारी, जत या कार्यालयामध्ये एक कृषि अधिका-याचे पद मंजूर असून ते भरलेले आहे.

जत तालुक्यामध्ये एकुण ४ मंडळ कृषि अधिका-यांची पदे मंजूर असून त्यापैकी मंडळ कृषि अधिकारी शेगांव, उमदी व माडग्याळ ही ३ पदे भरलेली आहेत.उर्वरीत मंडळ कृषि अधिकारी, जत या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-याकडे सोपविण्यात आलेला असून कृषि योजनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) होय.
(४) महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ संवर्गातील १९, महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील ६१ व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १२३ पदांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पदभरतीची जाहिरात दि. १८/०४/२०२२ रोजी विज्ञापित केली आहे.

कृषि पर्यवेक्षक संवर्गातील १८२ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गात दि. १८ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली असून त्यापैकी १ अधिकाऱ्यास सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील मंडळ कृषि अधिकारी, माडग्याळ या पदावर पदस्थापना दिलेली आहे.

तसेच कृषि पर्यवेक्षक संवर्गातील ३५८ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गात पदोन्नती देण्याकरिता सन २०२१-२२ च्या निवडसूचीस मान्यता प्राप्त झाली असून पदोन्नतीची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर भरण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील अवैध वायु प्रदूषण चाचणी केंद्रबाबत (पीयुसी)

(२७) ४००५१ (०९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून परवानगी काढलेले जिल्हयात फक्त ४५ वायु

प्रदूषण चाचणी केंद्रबाबत (पीयुसी) असून त्यापैकी अनेक केंद्र हे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कार्यालयाच्या बाहेरच कार्यरत असल्याचे दि.११/१२/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरातील पेट्रोल पंपावर एकही वायु प्रदूषण चाचणी केंद्र नसून याकडे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अमरावती शहरातील वाहनचालकांना पेट्रोल पंपावर वायु प्रदूषण चाचणी केंद्र सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. अनिल परब (२६-०५-२०२२) : (१) "दुचाकीची पीयुसी कोण करतो का रे भाऊ ?" अशा मथळ्याचे वृत दै.लोकमत या वृत्तपत्राच्या "हॅलो अमरावती" आवृत्तीमध्ये दि.११.११.२०२१ रोजी प्रसिध्द झाले आहे.

तथापि, अमरावती जिल्ह्यातील एकूण ५० मान्यताप्राप्त वायु प्रदुषण चाचणी केंद्रे अर्थात पीयुसी सेंटर पैकी ०६ पीयुसी सेंटर हे अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयानजिक खाजगी मालकीच्या जागांमध्ये कार्यरत आहेत ही वस्तुस्थिती आहे. याव्यतिरिक्त अमरावती शहरात २७ पीयुसी सेंटर्स असून जिल्ह्यातील विविध तालुक्याच्या ठिकाणी १७ पीयुसी सेंटर्स आहेत.

(२) व (३) अमरावती शहरात ४५ पेट्रोल पंप असून त्यांचेमार्फत पीयुसी सेंटर्स सुरु करण्यासाठी मोटार वाहन निरीक्षकांमार्फत लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच दि. २१.०२.२०२२ रोजी पेट्रोल पंप चालकांची बैठक घेऊन पीयुसी सेंटर्स सुरु करण्याविषयी प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत कोणत्याही पेट्रोल पंप चालकाने वायु प्रदुषण चाचणी केंद्र सुरु करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे अर्ज सादर केलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात केंद्र व राज्य शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येत असूनही अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

(२८) ४०३१४ (०९-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २२ हजारांपेक्षा अधिक ग्रामीण भागात पाणी टंचाई असून येथील नागरीकांना प्रति व्यक्ती ४० लिटरपेक्षाही कमी पाणी उपलब्ध होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनातर्फे अनेक योजना राबविण्यात येत असूनही राज्यातील अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) अशंत: खरे आहे.

जानेवारी, २०२२ पासून राज्यात साधारणत: १०४४० गावे /वाडयामध्ये पाणी टंचाई निदर्शनास आली आहे.

(२) व (३) राज्यात केंद्र शासन प्रणीत जल जीवन मीशन सन २०२० पासून राबविण्यास मान्यता देण्यात आलेली असून यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला २०२४ पर्यंत वैयक्तीक नळ जोडणीद्वारे गुणवत्तापूर्वक पाणी पुरवठा करण्याचे लक्ष्य असून सदर जल जीवन मीशन ५०:५० टक्के केंद्र व राज्य हिश्याने राबविण्यात येत आहे.

तसेच टंचाईग्रस्त गावात /वाडयात /क्षेत्रात पाणी टंचाई निवारण्यासाठी टंचाई अंतर्गत उपाययोजना राबविण्यात येत असून सदर क्षेत्रात प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना प्राथम्याने पूर्ण करण्यासाठी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका मदतनीस आणि मिनी सेविकांच्या नियुक्ती बाबत

(२९) ४०३२१ (१२-०४-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका मदतनीस आणि मिनी सेविकांच्या सुमारे ४०० जागांची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२१ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सेविकांना नियुक्ती आदेश अद्याप देण्यात न आल्याने त्या नियुक्ती आदेशाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अंगणवाडी सेविकांना रिक्त जागा असतानाही तात्काळ नियुक्ती आदेश न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहे,
(४) तसेच, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
राज्यात अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे पदभरतीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार भरतीची कार्यवाही सूरु असून भरती प्रक्रिया पूर्ण झालेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे रिक्त पदांच्या भरती संदर्भात शासन निर्देशानुसार रिक्त पदांच्या भरती प्रक्रिया पुर्ण होणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. सद्यस्थितीत १५६१ अंगणवाडी सेविका, ३३४ मिनी अंगणवाडी सेविका, व ८५७ अंगणवाडी मदतनीस यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. काही जिल्हयांमध्ये आचारसंहिता लागू झाल्याने भरती प्रक्रियेस विलंब झालेला आहे. तथापि, जसजशी भरती प्रक्रिया पूर्ण होईल, त्या त्या प्रमाणे नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील अंगणवाडी सेविका व इतर अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(३०) ४०३५३ (१२-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गावामध्ये अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका व इतर अनेक पदे रिक्त असल्याने लहान बालकांना पोषण आहर व इतर सुविधा मिळण्यास अडचण निर्माण होत असल्याचे दिनाक १२ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास, महिला बालकल्याण अधिकारी, राळेगाव यांनी तालुक्यातील अंगणवाडी केंदातील रिक्त पदाचा अहवाल जिल्हयाला पाठविला आहे परंतू अजुन पर्यत रिक्त पदे भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर अंगनवाडी केंद्रातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०४-२०२२) : (१), (२), (३) व (४) माहे जानेवारी २०२२ अखेर राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील १५८ मंजूर अंगणवाडी सेविकांच्या पदांपैकी ९ पदे रिक्त, १५८ मंजूर अंगणवाडी मदतनीस यांच्या पदांपैकी ३२ पदे रिक्त व २६ मिनी अंगणवाडी सेविकांच्या पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे असल्यामुळे लहान बालकांना पोषण आहार व इतर सुविधा मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेवून लगतच्या अंगणवाडी सेविकांकडे सदर केंद्रांचा पदभार देण्यात आलेला आहे व सर्व केंद्रांचे नियमित कामकाज सुरळीत सुरु आहे. तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे रिक्त पद भरतीबाबत दिलेल्या मागदर्शक सूचनानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. त्यापैकी २ मिनी अंगणवाडी सेविका पदांकरिता अर्हता पात्र उमेदवार न मिळाल्यामुळे सदर पद भरती झालेली नाही. तसेच उर्वरित रिक्त पदांच्या भरतीबाबत निर्णय झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला (जि.अकोला) येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणाबाबत

(३१) ४०३८२ (२८-०३-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेल्या भुसंपादन मोबदला करीता सुमारे ७९ कोटी रूपये निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी दिर्घ काळापासून मंजुरीच्यात प्रतिक्षेत असून सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी २२.२४ हे. आर भूसंपादनापूर्वी प्रथमत: त्याबाबतचा व्यवहार्हता अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, व त्या अनुषंगाने उक्त प्रस्तावास मंजुरी व निधी वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (२८-०४-२०२२) : (१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने अकोला येथील शिवणी विमानतळ भुसंपादनासाठी सुमारे ९५ कोटीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(२) व (३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार व्यवहार्यता अहवाल सादर करण्यासाठी भारतीय विमानपतन प्राधिकरणास दि.०२.०३.२०२० रोजी प्रथम विनंती करण्यात आली.त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर अंतिमता अध्यक्ष भारतीय विमानपतन प्राधिकरण यांनी मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांना दि.१३.१२.२०२१ रोजी च्या पत्रान्वये अकोला विमानतळाकरिता आर.सी.एस अंतर्गत रुट मिळाल्यास तेथील धावपट्टीचे आहे त्या जागेतच १८०० मीटर X ४५ मीटर विस्तारीकरण केले जाईल असे नमूद केले असून फक्त नाईट लॅन्डींग सुविधा पुरवावयाची असल्यास त्याकरिता सुमारे ५१.६५ एकर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता असेल असे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांना विहीर अधिग्रहणाचे पैसे देण्याबाबत

(३२) ४०७०१ (०९-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) बुलढाणा जिल्हयात गत वर्षात पाणी टंचाईग्रस्त गावांमधील पाणी टंचाई दुर करण्यासाठी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील जवळपास ५३ पेक्षा जास्त गावांतील शेतकऱ्यांना विहीर अधिग्रहणाचे ज्या दिनांकापासून अधिग्रहित केली त्याच दिनांकापासून शेतकऱ्यांना पैसे मिळणे अपेक्षित असल्याचे गटविकास अधिकारी यांनी सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव तहसीलदार, बुलढाणा यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर महसूल मंडळ अधिकारी यांच्या सहया असताना सुद्धा तहसीलदार, बुलढाणा यांनी सदर प्रस्ताव वेळेत दिले नाही असे सांगून प्रस्ताव मंजूर करीत नसल्याने शेतकऱ्यांना विहीर अधिग्रहणाचे पैसे मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे जुन, २०२१ नंतर तालुक्यामध्ये समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे ३४ वाढीव विहीर अधिग्रहणाचे प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली असून दिनांक ३० जुन २०२१ पर्यंतच्या कालावधीकरिता संबंधित शेतक-यांना १६.१९ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे व उर्वरित निधी वितरीत करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, कोविड कालावधीमध्ये प्राप्त झालेले विहिर अधिग्रहणाचे प्रस्ताव कार्यालये १०० टक्के क्षमतेने सुरु नसल्याने सदर प्रस्तावांना सादर करतेवेळी व मंजूरी करिता विलंब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी विहीर अधिग्रहणाचे पैसे देण्याची मागणी विहीर धारक शेतकऱ्यांनी वारंवार मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच तहसीलदार, जिल्हाधिकारी यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) होय,
(२) व (३) अंशत: खरे आहे,

बुलडाणा तालुक्यातील ४४ गावाकरिता ४९ विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सदर प्रस्तावापैकी ४५ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित चार गावातील प्रस्तावांना विहीरीस पाणी कमी असल्यामुळे नामंजूर करण्यात आले आहे.

संबंधित शेतक-यांना दिनांक ३० जुन, २०२१ या कालावधी दरम्यानचे अनुदान वाटप करण्यात आलेले असून विहिर अधिग्रहण मंजूर दिनांकापासून निधी देण्यात आला आहे.
(४) होय
(५) अशंत खरे आहे

कोविड कालावधीमध्ये कार्यालये १०० टक्के क्षमतेने सुरु नसल्याने, गट विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव विलंबाने सादर करण्यात आले. मात्र प्रस्ताव प्राप्त होताच मंजूरी देण्यात आली.
(६) अशंत खरे आहे

विहिर धारक शेतक-यांनी जिल्हाधिकारी तसेच मा. महसूल राज्यमंत्री यांचेकडे विहिर अधिग्रहण मोबदला मिळणेसाठी मागणी केली होती.
(७) तहसिलदार, बुलडाणा व गट विकास अधिकारी, बुलडाणा यांना नियमानुसार उचित कार्यवाही करुन विहिर अधिग्रहणाचे निधी वितरीत करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

गोंदिया जिल्हयातील गावांना पाणीपुरवठा करणा-या बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद झाल्याबाबत

(३३) ४०९३३ (०९-०४-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील ४८ गावांना पाणीपुरवठा करणा-या बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरिंग सर्व्हीसेसचे कंत्राट संपले असून त्यांना अद्याप प्रलंबित देयके देण्यात आली नसल्याने माहे जानेवारी, २०२२ पासून येथील पाणीपुरवठा योजना बंद करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात आढावा घेऊन उक्त ४८ गावांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) सदर योजनेचा पाणी पुरवठा सुरु असून, बनगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे सन २०१७-१८ चे वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे कामाचे कंत्राट दिनांक १३.६.२०१८ पासून १२ महिन्यांकरीता लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना देण्यात आले आहे. सदर कामास मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या पुढील आदेशापर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. नवीन ई-निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण करण्यात येईल. तसेच सदर योजनेची प्रलंबित देयके तयार करण्यात आली असून ४८ गावांपैकी ३४ गावांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमधून पाणी पुरवठा चालु असून उर्वरित १४ गावांमध्ये स्वतंत्र पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सडक (ता.अर्जुनी, जि.गोंदिया) येथील तहसील कार्यालय भाडेतत्वाच्या खोलीत सुरु असल्याबाबत

(३४) ४०९४२ (०७-०४-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक (ता.अर्जुनी, जि.गोंदिया) येथील तहसील कार्यालय हे शेतकरी रामलाल केवलराम हेमने याच्या खोलीत भाडेतत्वावर सुरु असून गेल्या ६५ महिन्यांपासून घरभाडे घर मालकाला दिलेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील घरमालकाला भाडे अदा करण्याबाबत तसेच तलाठी कार्यालय शासकीय इमारतीत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (३१-०५-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.

शेतकरी रामलाल केवलराम हेमने यांच्या खाजगी जागेमध्ये भाडेतत्वावर तहसिल कार्यालय, सडक अर्जुनी हे कार्यालय नसून तलाठी कार्यालय साजा क्र.८ परसोडी, ता. सडक अजुर्नीचे कार्यालय आहे.

(२) तहसिल कार्यालय, सडक अर्जुनी मधील एकूण १८ पैकी १३ तलाठी कार्यालय खाजगी इमारतीमध्ये भाडेतत्वावर आहेत. सदर घरमालकाचे माहे सप्टेंबर २०१६ पासून ते माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंतचे घरभाडेची एकूण रक्कम रुपये ५०,२९२/- इतकी दि.२३/०३/२०२२ रोजी संबंधितास अदा करण्यात आलेली आहे.

तसेच तलाठी कार्यालयाच्या बांधकामाकरीता प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२ अंतर्गत शासकीय कार्यालयीन इमारती या योजनेअंतर्गत एकूण २३ तलाठी कार्यालये बांधकामाकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर, बोदवड व रावेर (जि. जळगाव) येथील गावांचा पोकारा योजनेत समावेश करण्याबाबत

(३५) ४१११८० (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील मुक्ताईनगर, वढवे, कासारखेडा, निमखेडा खु., माळेगाव, सातोड, चारठाणा, मोरझिरा, मधापुरी, धामनगाव, बोदवड, काकोडा, बोरखेडा, राजूरे, धाबे, रामगड, कोठे, लोहारखेडा, पिंप्री भोजना, कर्की, पिंप्री अकाराउत ही गावे पोकरा(नानाजी देशमुख कृषि संजीवनी) योजनेत समावेश नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बोदवड तालुक्यातील बोदवड, मनूर खु., मनुर बु., नांडगांव,सोनोटी, जुनोने, आंमदगाव, शिरसाळे, कोल्हाडी, हिंगणे, चिंचखेड सिंम, एणगांव, निमखेड, बरखेड बु., बरखेड खु., राजूर, नांदगांव, पळासखेडा खु., हरणखेड, चिखली बु., वडजी, चिंचखेड प्र.बो., शेवगे बु. घाणखेड, कु-हे हरदो, शेवगे खु.,धोंडखेडा, साळशिंगी, भानखेडा, सुरवाडे बु., सुरवाडे खु., मानमोडी, विचवे, गोळेगांव बु., गोळेगांव खु., करंजी, पाचदेवळी ही गावे देखील पोकरा(नानाजी देशमुख कृषि संजीवनी) योजनेत समाविष्ट नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, रावेर तालुक्यातील मस्कावद बु.मस्कावद खु. मस्कावद सीम वाघोदे खु, मांगी, चुनवाडे, सावदा (ग्रामीण/शहरी) तांदलवाडी, बलवाडी, मांगलवाडी, सिंगत, सुनोदे,थोरगव्हाण, गाते, उदळी बु.,लुमखेडा, चिनावल, खिरोदा प्रया. कळमोदे, जानोरी, लोहारा, चिंचाटी, गौरखेडा, कुंभारखेडा, सावखेडा बु., सावखेडा खु. रोजोदा, बोरखेडा सीम, कोचूर बु., कोचूर खु.,वाघोदा बु., दसनूर, सिंगनूर, आंदलवाडी, सहस्त्रलिंग, गारबर्डी, अभोडा बु., लालमाती, मोहमांडली जुनी, खिरोदा प्र.रा, रसलपूर, कुसुंबा बु., कुसुंबा खु, गुंजलवाडी, पिंप्री, मोहगण बु., मंगरुळ, के-हाळे

बु., अहिरववाडी, पाडले बु, अजनाड, अटबाडे, दोघे, खानापूर, निरुळ, मोरगांव बु. मोरगांव खु., भोकरी, बोरखेडे, तामसवाडी, बाघोड, कर्जाद, रावेर (ग्रामीण) रमजीपूर, बक्षीपूर,सिंदखेडा, रावेर (शहरी) , होळ, ऐनपूर, निंबोल, खिरवड, मेहते, थेरोळे, पातोंडी, धूरखेडे, निंभोरा सीम, बोह-डे, पुनखेडे, बिटवे, नांदूरखेडा, सांगवे, अजंदे, धामोडी, कांडवेल, कांळदा, सिंगाडी, सुलवाडी, वाघाडी, खिर्डी बु. खिर्डी खु, गोलवाडे, धामलवाडी, पुरी, रेंभाटे, निंभोरा बु. उटखेडा, भाटखेडा, विवरे बु.,विवरे खु,वडगांव ही गावे देखील पोकरा योजनेत समाविष्ट नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे गावातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने तसेच ही गावे पोकरा योजनेत समाविष्ट न करण्याची कारणे काय आहेत व समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) ते (४) नाही, अशी बाब नाही.

दिनांक १७ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली असून त्यानुसार जळगांव जिल्ह्यातील १५ तालुक्यातील ४६० गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील उर्वरित गावांमध्ये कृषि विभागाच्या अन्य योजनांचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत कोव्हिड रुग्णांना मोफत उपचार मिळण्याबाबत

(३६) ४११९३ (११-०४-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाने बाधीत झालेल्या रुग्णांवर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार करण्यात यावेत असा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार या योजनेचा लाभ मिळण्यासाठी किती रुग्णांनी आतापर्यंत शासनाकडे अर्ज केला आहे,

(३) असल्यास, या अर्जाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (२७-०५-२०२२) : (१) होय.

राज्यात कोरोना संसर्गाने बाधीत झालेल्या रुग्णांवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत २० पॅकेज अंतर्गत मोफत उपचार करण्यात यावेत, असा निर्णय दिनांक २३ मे, २०२० च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने घेतलेला आहे.

(२) सदर शासन निर्णयानुसार या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आतापर्यंत शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांनी २,११,००४ उपचाराची परवानगी मिळण्यासाठी संगणक प्रणालीवर प्रकरणे सादर केली आहेत.
(३) व (४) योजनेंतर्गत रुग्णालयांमार्फत सादर केलेल्या प्रकरणांच्या अनुषंगाने उपचार झाले असून पुढील कार्यवाही राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत सुरु आहे.

चंद्रपूर येथील शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थीनीच्या वसतीगृहाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(३७) ४१३९५ (०९-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय चंद्रपूर येथील अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थीनीच्या वसतीगृहाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (३०-०५-२०२२) : (१) होय.
(२) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे अनुसूचित जाती/ जमाती या प्रवर्गातील विद्यार्थीनींसाठी वसतीगृह इमारत बांधकामासाठी रु.७.८९ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास शासन ज्ञापन क्र.बांप्रमा-१०१९/१५५/१९/तांशि-३, दि.१० फेब्रुवारी, २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

कोठारी (ता. बल्लारपूर) येथील नवीन पाणी पुरवठा योजनेच्या विविध अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता प्रदान करण्याबाबत.

(३८) ४१४२२ (०९-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर): सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोठारी (ता. बल्लारपूर) येथील नवीन पाणी पुरवठा योजना, वाढीव वितरण व्यवस्था, नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी, बल्लारपूर यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चंद्रपूर यांना दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत जल जीवन मिशन कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत चंद्रपुर जिल्हयाचा पाणी पुरवठा योजनांचा आराखडा जिल्हा परिषद चंद्रपुर मार्फत तयार करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने कोठारी (ता. बल्लारपूर) येथील वाढीव वितरण व्यवस्था व घरगुती नळ जोडणीच्या कामाचे अंदाजपत्रक रु.७७.२७ लाख जिल्हा परिषद मार्फत तयार करण्यात आले असुन दि. २२.०४.२०२२ रोजी सदर अंदाजपत्रकास तांत्रिक पडताळणी समितीकडून तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

दौंड (जि. पुणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

(३९) ४१८१६ (२४-०४-२०२२). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र रावणगाव व नानगाव तसेच उपकेंद्र बोरीपार्धी, खामगाव, कुरकुंभ, गिरिम, सोनवडी, खानोटा व मलठण या ठिकाणच्या इमारतींची दुरावस्था झाली असून काही ठिकाणी तर इमारती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारतीची दुरुस्ती करणे तसेच नव्याने बांधणेबाबत लोकप्रतीनिधिनी दि. २० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारती दुरुस्ती तसेच बांधकामासाठी निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

श्री. राजेश टोपे (२६-०५-२०२२): (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) ०१ प्राथमिक आरोग्य केंद्राची पुनर्बांधणी पुर्णत्वास आली आहे तर ०२ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. इतर आरोग्य आरोग्य संस्था पुनर्बांधणीस जिल्हा नियोजन समितीमधून तसेच १५ व्या वित्त आयोगातुन निधीची मागणी करण्यात आली आहे.

मांडवी ता. झरीजामणी जि. यवतमाळ येथील पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत

(४०) ४२३२४ (०९-०४-२०२२). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांडवी (ता. झरीजामणी, जि.यवतमाळ) या गावासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम मंजुर करण्यात आले असून सदर काम मागील दोन वर्षापासुन सुरु असुन निकृष्ठ दर्जाचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळा जवळ आल्यामुळे गावात पाण्याची कमतरता असल्याने ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दि.०८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणी पुरवठा पाईपलाईन व विहीरीचे बांधकामास निधी उपलब्ध असतांनाही जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग अभियंत्याच्या दुर्लक्षामुळे अद्याप पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (३१-०५-२०२२) : (१) हे खरे नाही,
पाणी पुरवठा योजना मांडी ता. झरी अंतर्गत आज रोजी पर्यंत गावातील वितरण व्यवस्थेचे ७५% तर विहिरीचे ३०%काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामांतर्गत पुरविण्यात आलेल्या पाईपची त्रयस्थ तपासणी अहवाल उपलब्ध आहे.तसेच उद्भव विहीरीचे बांधकाम सुध्दा उत्तम दर्जाचे आहे. कोणतेही काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात आलेले नाही.
(२) हे खरे नाही.
सदर गावाची लोकसंख्या सुमारे १२७० आहे. सदर गावांत ४ हातपंप असून ४ हातपंपावरुन पाणीपुरवठा सुरु आहे. गावात १ विद्युत पंप व३ अश्वशक्ती पंप बसवून गावात पाणी पुरवठा करण्यात येत आहे. गावातील ६०% कुटुंबाकडे खाजगी बोअर /विद्युत पंपची सुविधा उपलब्ध असून त्याद्वारे पाणी उपलब्ध होत आहे त्यामुळे गावात पाणी टंचाई नाही.
(३) हे खरे नाही.
सदर योजनेच्या कामास उद्भव विहीरीस सुरुवात केली असता विहीर ही नदीच्या कडेला असल्याने अतीतीव्रउतार व काळा पाषाण खडक लागल्यामुळे काम करणे शक्य झाले नाही. त्यानंतर लगेच कोविड १९ चे प्रादुर्भाव मुळे सर्वत्र लॉकडाऊन झाल्याने मजूर, मटेरीअल व मशिनरी अभावी काम करणे शक्य झाले नाही. सप्टेंबर२०२० मध्ये योजनेच्या कामास विलंब होऊ नये म्हणून वितरणे व्यवस्थेचे काम करण्यात आले. त्यानंतर सहायक भूवेज्ञानिक यांनी परत पाहणी करुन योजनेच्या उद्भवाकरिता स्थळ बदली प्रमाणपत्र दि. २३.४.२०२१ रोजी दिले. सदर नवीन उद्भवाची जागा ही नदी पात्रात असल्याने मे. २०२१ मध्ये कामांस सुरुवात करण्यात आली व जुन २०२१ पर्यंत ३०% पूर्ण करण्यात आले. त्यानंतर निधी अभावी सुमारे ६ महीने काम बंद होते व आजही योजनेची उद्भव विहीर ही नदी पात्रात असल्याने आजही नदी पात्रामध्ये प्रवाह असल्याने कामास सुरुवात करण्यात आलेली नाही.
(४) योजनेची उद्भव विहीर ही नदी पात्रात असल्याने व अद्याप नदी पात्रामध्ये प्रवाह असल्याने कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. तरी १५ मे २०२२ नंतर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यानंतर १५ जून २०२२ पर्यंत विहीरीचे काम पूर्ण करून व माहे ऑगस्ट २०२२ पर्यंत अखेरीस गावात पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.
(५) उद्भव विहीरीची जागा बदलल्या मुळे, व कोविड १९चे प्रादुर्भाव झाल्याने सर्वत्र लॉकडाऊन झाल्यामुळे, निधी प्राप्त न झाल्यामूळे व नवीन उद्भव विहीर ही नदी पात्रात असल्याने १ नदीला पाण्याचा प्रवाह मे पर्यंत राहत असल्यामुळे, कामास विलंब झाला आहे.

बीड जिल्हयातील बीड व शिरुर कासार तालुक्यातील कृषी योजनासंदर्भात सर्व लेखाशिर्ष अंतर्गत आलेल्या निधीचा खर्चाचा तपशील व कार्यालयातील कामकाजाबाबत

(४१) ४२४३२ (०७-०४-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील बीड व शिरुर कासार तालुक्यातील कृषी अधिकारी अधिक्षक कार्यालयाकडून सन २०१९ ते २०२१ या कालावधीत सर्व संवर्गातील मंजूर पटसंख्या व कार्यरत मनुष्यळ किती आहे तसेच या कार्यालयाच्या कामकाजाच्या विगतवारीनुसार एकूण कार्यसने किती, त्यातील सर्व कामकाजाचे उपलब्ध मनुष्यबळाकडे कार्यसननिहाय जबाबदारीचे वाटप कसे केले आहे यासह अनेक विविध मुद्यांबाबत स्थानिक प्रतिनिधी म्हणून दिनांक ०४ ऑगस्ट, १३ सप्टेंबर, ०३ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखादा नागरिक किंवा लोकप्रतिनिधी यांनी मागविण्यात आलेली माहिती ठराविक कालावधीत, मागणी करणाऱ्या संबंधितांना पाठविणे वा त्याबाबत प्राथमिक स्वरुपाचे उत्तर पाठविणे हे कार्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सेवाविषयक कायद्यानुसार बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट, २०२१ पासून प्रकरणानिहाय मागविण्यांत आलेली माहिती अद्यापही संबंधित लोकप्रतिनिधींना पाठविण्यांत आली नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू माहिती अद्यापही न पाठविण्याची कारणे काय आहेत व त्यास कोण जबाबदार आहेत व त्यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) व (२) होय.

(३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी संबंधित मा. लोकप्रतिनिधींना दिनांक ०४/०८/२०२१ च्या पत्रान्वये मागविलेली आस्थापना विषयक माहिती दिनांक ०५/०८/२०२१ आणि अनुषंगिक दिनांक ११/११/२०२१ च्या पत्रान्वये उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक १३/०९/२०२१ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती दिनांक २९/०९/२०२१ च्या पत्रान्वये उपलब्ध करून दिली आहे. तद्नंतर मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३/१०/२०२१ च्या पत्रान्वये मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने आस्थापना विषयक माहिती दिनांक ०३/१०/२०२१ रोजी आणि उर्वरित तांत्रिक व लेखा विषयक माहिती तालुका कृषि अधिकारी, बीड व शिरूर कासार यांनी त्यांच्या दिनांक १२/११/२०२१ आणि दिनांक १५/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. लोकप्रतिनिधींना माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी, बीड यांनी मा. लोकप्रतिनिधींना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाबाबतची माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कृषि विभागात पदांची संरचना करणे आवश्यक असल्याबाबत

(४२) ४२५२२ (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषि विभागाची संरचना झाली तेव्हा संस्थानात्मक शासन निर्णयानुसार एका कृषि सहायकाच्या पद निर्मिती करता १ हजार हेक्टर पहाडी भागासाठी एक कृषि सहायक व मैदानी भागासाठी १५०० हेक्टर वर एक कृषि सहायक प्रमाण ठरविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्तापर्यंत शेतक-यांची (खातेदारांची) संस्था वाढलेली असून संख्येनुसार कृषि विभागाच्या पदांची संरचना करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२): (१) नाही. सन १९९८ मध्ये कृषि खात्याची पुनर्रचना केल्यानुसार एका कृषि सहायकाने ग्राम पातळीवर सरासरी ३ ते ४ गावांच्या समुहाकरिता (सरासरी १००० शेतकरी कुटुंबे) किंवा सरासरी १५०० हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्रातील किंवा सरासरी ३००० हेक्टर एकूण भौगोलिक क्षेत्रातील फलोत्पादन, मृदसंधारण आणि कृषि योजनामधील सर्व कामे पार पाडणे अपेक्षित आहे.

(२) व (३) कृषि विभागाचा (कृषि आयुक्तालय) सुधारित आकृतिबंध (क्षेत्रीय स्तरापासून ते राज्यस्तरीय कार्यालयाचा) तयार करण्याचे काम सुरू आहे. प्रस्तावित आकृतिबंधात कृषि विभागातील योजनांची व्याप्ती, तंत्रज्ञानातील वृध्दी, कृषि विस्तार आणि फलोत्पादन व मृदसंधारण कार्याची वाढलेली गरज लक्षात घेऊन कार्यालयांचे बळकटीकरण करण्याचे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाघाळा (जि.नांदेड) शहर महानगरपालिकेने तुप्पा येथील घनकचरा प्रकल्पासंदर्भात स्वच्छ भारत अभियान समितीची दिशाभूल केल्याबाबत

(४३) ४२९९७ (०१-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड- वाघाळा (जि. नांदेड) शहर महानगरपालिकेने तुप्पा येथील घनकचरा प्रकल्पांसंदर्भात स्वच्छ भारत अभियान समितीची दिशाभूल केली असल्याचे दि. ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीच्या आश्वासनापूर्वी या प्रकल्पासमोर लावण्यात आलेल्या फलकावर प्रमुख म्हणून या प्रकल्पाशी संबंधित नसलेल्या अधिकाऱ्याचे नांव टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील समितीची दिशाभूल करणाऱ्या दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास शहर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केद्र शासन, राज्य शासनामार्फत कोणतीही समिती दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास नांदेड शहरास भेटीस तथा तपासणीस आलेली नव्हती असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) हे खरे नाही तथापी, तपासणी वेळी परिक्षकास त्या प्रकल्पाची व प्रकल्पातील विविध घटकांची सविस्तर माहिती होणेस्तव व इतर माहिती देणे करीता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची देखरेख करणारे महानगरपालिकेतील कार्यरत असलेले जेष्ठ स्वच्छता निरीक्षक श्री. राजेंद्र गंदमवार यांचे नाव लिहीलेले फलक लावण्यात आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील मुदत संपूनही फायर एस्टिंगविशरची रिफिलिंग केली नसल्याबाबत

(४४) ४३७६६ (१२-०४-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा): सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जुन्या इमारतीस कांही वर्षापूर्वी लागलेल्या आगीत महत्वाचे दस्तावेज तसेच संगणक प्रणाली जळून नुकसान झाले असल्यची दुर्घटना घडल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीच्या दर्शनी भागावर लावलेल्या फायर एस्टिंगविशनरचे रिफिलिंग (अग्नीशामन दलाची यंत्रणा) १५ मे ,२०२० रोजी वा त्यासुमारापर्यत सुरु करायला हवे होते परंतु दोन वर्षाचा कालावधी उलटूनही रिफिलिंग केले गेले नसल्याचे माहे १६ फेब्रूवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुस-या कार्यालयाला आपत्ती व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संबधीत विभागालाच फायर एस्टिंगविशरचे रिफिलिंग केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (३१-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

सन २०१० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जुन्या इमारतीला आग लागून दुर्घटना झाली होती, यात कार्यालयीन अभिलेखे व संगणक व इतर अनुषंगिक साहित्याचे नुकसान झाले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात लॉकडाऊन असल्यामुळे स्थानिक पुरवठाधारक यांचेकडे मनुष्यबळ नसल्यामुळे रिफीलिंग करता येऊ शकलेले नाही.

(४) जिल्हाधिकारी कार्यालयात असलेले फायर एस्टिंगविशर हे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक विद्युत विभाग, उस्मानाबाद यांचेमार्फत बसविण्यात आलेले होते. सदर फायर एस्टिंगविशरची तपासणी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक विद्युत विभाग, उस्मानाबाद यांचेमार्फत तपासणी करण्यात आली. तांत्रिकदृष्टया वापरास योग्य नसलेले फायर एस्टिंगविशर (अग्निशामन दलाची यंत्रणा) बदलून नव्याने बसविण्यात आलेले आहे. तसेच दर तीन महिन्याला फायर एस्टिंगविशरची तपासणी करण्याचे निर्देश संबंधित कार्यकारी अभियंता सार्वजनिक विद्युत विभाग, उस्मानाबाद यांना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तलासरी, डहाणू, जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील रुग्णांना उपचारासाठी गुजरात राज्याच्या सीमेवरील भागांत महात्मा फुले योजनेअंतर्गत लाभ मिळण्याबाबत

(४५) ४३९५९ (२४-०४-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी, डहाणू, जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील रुग्णांना हृदयरोग, मूत्रिपड, यकृत, कर्करोग अशा अनेक वेगवेगळया व्याधींवर शस्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध नसल्यामुळे त्यांना गुजरात राज्याच्या सीमेवरील भागातील रुग्णालयांमध्ये जाऊन उपचार घ्यावे लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उपचारासाठी गेल्यानंतर रुग्णांकडे पंतप्रधान जन आरोग्य योजनेचे कार्ड असूनही ते महाराष्ट्राचे रहिवासी असल्यामुळे त्यांना योजनेचा लाभ नाकारला जातो, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, रुग्णांना गुजरातमध्येही पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी सीमा भागातील नागरिक करत आहेत, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णांना गुजरातमध्येही पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (२७-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.

तलासरी, जव्हार, डहाणू (जि. पालघर) या तालुक्यामध्ये ह्दयरोग, मूत्रपिंड, यकृत, कर्करोग या आजारावरील उपचार सेवा उपलब्ध नसल्यामुळे, तसेच सदर तालुक्यातील रुग्ण भौगोलिकदृष्टया हयांना जवळ असलेल्या गुजरात सीमा भागातील रुग्णालयांमध्ये उपचार घेतात. ह्दयरोग, मूत्रपिंड, यकृत, कर्करोग या सर्व सुविधा १८ रुग्णालये (१३ खाजगी व ५ शासकीय) अंगीकृत रुग्णालयांमध्ये पालघर जिल्हयात उपलब्ध आहेत. मात्र या ३ तालुक्यातील रुग्णांना अंगीकृत रुग्णालयांपेक्षा गुजरात मधील रुग्णालये जवळ पडत असल्याने रुग्ण तेथे उपचार घेतात.

(२) रुग्णांकडे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे कार्ड असूनही ते महाराष्ट्राचे रहिवासी असल्यामुळे, त्यांना योजनेचा लाभ नाकारला जाण्याबाबत तक्रार/अर्ज/निवेदन प्राप्त नाही. तथापि Portability च्या नियमानुसार महाराष्ट्रातील आयुष्यमान कार्डधारक रुग्ण गुजरात राज्यातील अंगीकृत रुग्णालयात लाभ घेतात.

(३) गुजरातमध्येही पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी सीमा भागातील नागरिक करत असल्याच्या विषयाबाबत अर्ज/ निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली (मुंबई) पोलीस ठाणे येथे एका महिलेचा विनयभंग करुन मारहाण केल्याबाबत

(४६) ४४००० (२४-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) पोलीस ठाणे येथे वॉर्ड क्र.१६ मध्ये एका महिलेचा विनयभंग करुन मारहाण करण्यात आल्याबाबत दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील गुन्हेगारांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०५-२०२२) : (१) दि. २२.०९.२०२१ रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार बोरिवली पोलिस ठाणे, मुंबई येथे गु. र .क्र. १०४४/२१ भा. द. वि. कलम ३५४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्हयातील आरोपीविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून मा. न्यायालयाने आरोपीस अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हवेली तालुक्यातील (जि.पुणे) अंतर्गत खडकवासला तालुका कृषी अधिकाऱ्याच्या कर्तव्यात दुर्लक्ष होत असल्याबाबत

(४७) ४४०१५ (०७-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्याअंतर्गत खडकवासला तालुका कृषी अधिकाऱ्यांचे कर्तव्यात दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांना भेटी न देणे, लोकप्रतिनिधीना शासनाच्या कृषी विभागाच्या अखत्यारीतील उपक्रमांची व योजनांची माहिती न कळविणे, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी न करणे इत्यादी बाबी निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडकवासला तालुका भौगोलिक दृष्ट्या मोठा असतांना त्या भागातील शेतकऱ्यांना शासनाच्या योजना व तदनुषंगिक बाबींमध्ये कामकाज सुलभ करण्याच्या दृष्टीने कुठलेच धोरण अद्यापही तालुका कृषी अधिकारी यांनी राबविले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (३०-०५-२०२२) : (१) नाही,

(२), (३) व (४) हवेली तालुक्यातील खडकवासला हा भाग डोंगराळ असून तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र १३०१४२ हेक्टर इतके आहे. सन २०२१-२२ मधील खरीप हंगामात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत पिक पध्दतीवर आधारीत भात लागवड, चारसुत्री भात लागवड प्रात्याक्षिक, क्रॉपसॅप अंतर्गत शेतीशाळा इ. मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड, गांडूळ युनिट इ. महाडिबीटी अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण, पिक विमा इ. योजना राबविण्यात आल्या आहेत.

तसेच रब्बी हंगामात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत हरभरा, पौष्टीक तृणधान्य ज्वारी प्रात्यक्षिक, क्रॉपसॅप/आत्मा अंतर्गत हरभरा व ज्वारी शेती शाळा, महाडीबीटी अंतर्गत ठिबक / तुषार सिंचन इत्यादी योजना राबविण्यात आल्या.

कोरडवाहु विकास कार्यक्रमाअंतर्गत मुरघास युनिट, पॅकहाउस, गांडुळ युनिट, गाई/म्हैस खरेदी याबाबी राबविण्यात आल्या आहेत. तसेच प्रधानमंत्री सुक्ष्म खाद्य उन्नयन योजना, विकेल ते पिकेल अभियानांतर्गत आठवडी बाजार या योजना राबविण्यात आल्या आहेत.

वरिल योजना राबवितांना तालुका कृषि अधिकारी हवेली यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांना भेट देउन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. तसेच स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींना योजनांची सविस्तर माहिती दिली आहे. तसेच यापुढे मा. विधान सभा सदस्य /लोकप्रतिनिधी यांना कार्यक्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या नियोजनाबाबत वेळोवेळी अवगत करण्याकरिता दक्षता घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

तिसगाव (जि. औरंगाबाद) येथील स्टोन क्रशर धारकांकडे थकबाकी असल्याबाबत

(४८) ४४०७४ (०७-०४-२०२२). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिसगाव (जि.औरंगाबाद) शहरालगत असलेल्या शिवारात मोठ्या प्रमाणात गायरान जमीन असून महसूल विभागाने अनेकांना डोंगरलगतच्या जागेत स्टोन क्रशरची परवानगी दिली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गायरान जमिनीवर ४० वर्षापासून सुरू असलेल्या स्टोन क्रशर विरोधात सन २०१६ मध्ये तहसील कार्यालयाने दंडात्मक कारवाई करून १२ क्रशर चालकांना २८० कोटी रुपयांचा दंड आकारला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर २८० कोटी रुपये दंडची रक्कम अद्यापही वसूल करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) सन २०१६ मध्ये मौजे तिसगांव, ता. जि. औरंगाबाद येथील १३ खदानधारकांनी १०,१०,९७५ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केले असल्याचे उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, औरंगाबाद यांच्या पथकाने केलेल्या मोजणीमध्ये आढळून आले. त्याअनुषंगाने सदर १३ खदानधारकांना तत्कालीन तहसिलदार, औरंगाबाद यांनी नोटीसा दिल्या.

तदनंतर अपर तहसिलदार, औरंगाबाद यांनी सुनावणी घेवून सदर खदानधारकाकडून वेळोवेळी देण्यात आलेले परवानगी आदेश व स्वामित्वधनाचा भरणा यांचा ताळमेळ घेवून १३ खदानधारकाकडून रु.४५,१४,०२,२००/- एवढी फरकाची रक्कम भरणा करण्याचे आदेश पारीत केले आहेत. तसेच संबंधित १२ खदानधारकांविरूध्द पोलीस स्टेशन एम.आई.डी.सी. वाळूंज येथे गु.र. क्र.०२००/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये दि.१२.०३.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिक विमा धारक शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा

(४९) ४४४५३ (२४-०३-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर खाजगी कंपन्यांकडे पिक विमा भरीत असतात मात्र या पीक विमा कंपन्यांची सेवा जसे की, अतिवृष्टी झाल्यानंतर पिकांची पाहणी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे, तसेच पावसाअभावी पिके करपली असता त्याचीही नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नसल्याने शेतकऱ्यांना पिकाचा विमा दिला जात नसल्याची बाब या पीक विमा कंपन्यांकडून घडत आहे हे खरे आहे का,

(२) असल्यास, या पीक विमा कंपन्या केवळ शेतकऱ्यांकडून विम्याची रक्कम वसूल करतात मात्र शेतकऱ्यांना त्यांचे पीक वाया गेल्यानंतर त्यांना नुकसान भरपाई देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देत नसल्यामुळे या कंपन्यांची मान्यता रद्द करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (२१-०४-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२१ मध्ये राज्यातील ८४.०१ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग नोंदवून ४८.७० लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

योजने अंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत झालेले नुकसान या बाबीसाठी ४२.९६ लाख सूचना प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी एकूण ३८.९३ लाख सूचना प्राप्त शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २३८९.८६ कोटी निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी दि.२४.३.२०२२ अखेर ३६.३३ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २२३०.४७ कोटी नुकसान भरपाईचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत नुकसान भरपाई रक्कम रु. १५९.३९ कोटी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान या बाबी अंतर्गत २० जिल्हयांमार्फत अधिसुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर जिल्हयांतील एकूण १२.७० लाख नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४५०.८९ कोटी निश्चित करण्यात आले आहेत. त्यापैकी दि.२४.३.२०२२ अखेर ११.६७ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४३९.७४ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई रक्कम रु. ११.१५ कोटी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाईची परिगणना सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यांसाठी धडक सिंचन विहीर योजनेतंर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(५०) ४४४६६ (०७-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्याकरिता विधानसभा मतदार संघातील सन २०१९-२० या कालावधीत शासनाने धडक सिंचन विहिर योजनेंतर्गत १०८० विहिंरीकरिता १०५०.०० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना ८१९ विहिरी मंजुर करण्यात आल्या असून त्यापैकी ५०० विहिंरीचे बांधकाम हे पूर्ण झाले असून उर्वरित शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश दिले असतानी निधी अभावी अजूनपर्यंत कामे सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अजूनपर्यंत शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या संभ्रम निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मंजूर असलेल्या धडक सिंचन विहिरी पूर्ण करण्याकरीता शासनाने शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश देवून निधी उपलब्ध करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१७-०५-२०२२) : (१) विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० मधील पहिल्या टप्प्यात १०००० सन २०२०-२१ मधील दुसऱ्या टप्प्यात ३००० विहिरी अश्या १३००० सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत वर्धा जिल्हयासाठी २००० सिंचन विहीरींचा लक्षांक देण्यात आलेला आहे. त्यानुसार आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यांकरीता १०६५ लक्षांक देण्यात आलेला आहे. आतापर्यंत आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यांकरीता रु. ८१५.३४ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(२) १०६५ विहिरींपैकी ४२९ विहिरी सुरु करण्यात आलेल्या असून त्यापैकी १९३ विहीरींची कामे पूर्ण झालेली असून २३६ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात येत आहेत.
(३) व (४) निधीच्या उपलब्धततेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन : — **राजेन्द्र भागवत**
मुंबई. — **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.